**<u>ठळक बातम्या</u>**

- रेल्वेच्या ‘राउंड ट्रिप पॅकेज’ अंतर्गत प्रवाशांना परतीच्या प्रवासभाड्यात  २० टक्के सवलत मिळणार

- आर्थिक वर्ष २०२४-२५ मधे देशाचं संरक्षण उत्पादन एक लाख ५१ हजार कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर

- देशभरात रक्षाबंधनाच्या सणाचा उत्साह

- जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये नऊ दिवसांपासून सुरु असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान आज एक दहशतवादी ठार

**आणि**

- तापमान वाढीचे गंभीर परिणाम जगभरातल्या लाखो लोकांच्या आरोग्यावर होत असल्याचा जागतिक हवामान संघटनेचा इशारा

**<><><><>**

भारतीय रेल्वेने ‘राउंड ट्रिप पॅकेज’ नावाची योजना लागू करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत प्रवाशांना परतीच्या प्रवासात तिकिट दरात  २० टक्के सवलत दिली जाईल. दोन्ही बाजूंच्या प्रवासाचं आगाऊ तिकीट घेतल्यावरच ही सवलत लागू होईल, तसंच या तिकिटावर संबंधित प्रवाशाव्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती प्रवास करू शकणार नाही, असं रेल्वे मंत्रालयानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजने अंतर्गत आरक्षित केलेलं तिकीट रद्द केल्यावर त्याचा परतावा दिला जाणार नाही.

ऑक्टोबर १३ या तारखेपासूनची परतीची तिकिटं  येत्या १४ ऑगस्ट पासून आरक्षित करता येतील. एकदिशा प्रवासाकरता आगाऊ आरक्षण केवळ ६० दिवस आधी उपलब्ध असलं तरी परतीच्या प्रवासाचं तिकिट काढताना ६० दिवसांचा आगाऊ आरक्षण कालावधी लागू होणार नाही.

**<><><><>**

भारतीय रेल्वेनं रुद्रास्त्र या साडेचार किलोमीटर लांबीच्या मालगाडीची यशस्वी चाचणी घेतली. उत्तर प्रदेशातल्या चंदौलीत गंजख्वाजा स्थानकापासून झारखंडमधल्या गरवा स्थानकादरम्यानच्या २०९ किलोमीटरच्या टप्प्यात या गाडीची चाचणी घेतली. या गाडीनं ताशी साडेचाळीस किलोमीटर या वेगानं ५ तास १० मिनिटात हे अंतर पार केलं. ही आशियातली सर्वात लांब मालगाडी असून मालवाहतूक आणि मालाची चढउतार जलद होईल, त्यामुळे साधनसंपत्तीची आणि वेळेचीही बचत होईल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मधे देशाचं संरक्षण उत्पादन एक लाख ५१ हजार कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. संरक्षण औद्योगिक क्षेत्र बळकट होत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या वर्षीपेक्षा ही उत्पादनवाढ १८ टक्के जास्त आहे. यासाठी संरक्षणमंत्र्यांनी संरक्षण उत्पादन विभाग आणि इतर संबंधितांची प्रशंसा केली.

**<><><><>**

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण रक्षाबंधन आज देशभरात साजरा होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी रंगीबेरंगी राख्या, भेटवस्तू, मिठाईने बाजारपेठा फुलल्या आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रक्षाबंधनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भावाबहिणीतल्या परस्पर प्रेम आणि विश्वासाचं निदर्शक असलेला हा सण आपल्या समृद्ध परंपरेचा ठेवा असल्याचं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतल्या निवासस्थानी लहान मुलांबरोबर रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

नारळी पौर्णिमेचा सण काल राज्यात, विशेषतः किनारपट्टीच्या भागात उत्साहानं साजरा झाला. कोळी बांधवांनी समुद्रकिनारी पूजा करून प्रतिकात्मक नारळ समुद्रात अर्पण केला.

**<><><><>**

श्रावण पौर्णिमेला संस्कृत भाषा दिनही साजरा करण्यात येतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यानिमित्त संकृत भाषेचा गौरव करणारा संदेश दिला आहे. गेल्या दशकभरात केंद्र

सरकारनं संस्कृत भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी अनेक पावलं उचलली असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यात केंद्रीय संस्कृत विद्यापीठांची स्थापना आणि प्राचीन हस्तलिखितांच्या संगणकीकरणाचं ज्ञान भारतम अभियान यांचा उल्लेख त्यांनी केला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाद्वारे सरकारला आतापर्यंत ३४ कोटी रुपयांपेक्षा जास्त महसुली उत्पन्न प्राप्त झाल्याचं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी काल राज्यसभेत सांगितलं. या मासिक रेडियो कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रधानमंत्र्यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, नवोन्मेष आणि समाज सेवेच्या कार्यात भारतीय नागरिकांच्या प्रेरणादायी कामाची माहिती दिली आहे. देशभरात मोठ्या प्रमाणात विविध डीजिटल-ऑनलाईन माध्यमांद्वारे हा कार्यक्रम ऐकणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

<><><><>

श्रोते हो, स्वातंत्र्य दिन अवघ्या आठवडाभरावर आला आहे. आतापर्यंतच्या स्वातंत्र्य दिनाच्या तुमच्या काही आठवणी असतील तर त्या अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी आकाशवाणीनं तुम्हाला उपलब्ध करुन दिली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या संदर्भातल्या तुमच्या आठवणी सांगणारा व्हिडीओ रेकॉर्ड करा आणि फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर आमच्या airnews mumbai या अकाऊंटला टॅग करा. अधिकाधिक लोकांपर्यंत तो पोहोचवण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करू.

<><><><>

जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये दहशतवाद्यांविरुद्ध गेल्या नऊ दिवसांपासून सुरु असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान आज सकाळी एका दहशतवाद्याला भारतीय जवानांनी कंठस्नान घातलं. काल रात्री झालेल्या गोळीबारात दोन जवान शहीद झाले असून अनेक सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहेत.

लेफ्टनंट कर्नल प्रीतपाल सिंग आणि शिपाई हरमिंदर सिंग यांच्या सर्वोच्च बलिदानाला श्रद्धांजली वाहत असून त्यांचं धाडस आणि समर्पण आपल्याला नेहमीच प्रेरणा देईल, अशा शब्दात भारतीय लष्करानं शोकसंवेदना व्यक्त केली. ऑपरेशन अखल संदर्भात समाज माध्यमांवर या अनुषंगानं भारतीय लष्करातर्फे माहिती देण्यात आली आहे.

या परिसरात ८ दहशतवादी लपून बसल्याची खबर मिळाल्यावरुन शोध मोहीम राबवण्यात येत आहे.

**<><><><>**

इस्रायलच्या सुरक्षा विषयक मंत्रिमंडळानं गाझा शहर ताब्यात घेण्याच्या योजनेला मंजुरी दिल्याच्या पार्श्वभूमीवर, जर्मनीने इस्रायलला सर्व लष्करी सामग्रीची निर्यात थांबवली आहे. जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांनी काल हा निर्णय जाहीर केला. सध्याच्या परिस्थितीत, जर्मन सरकार पुढली सूचना मिळेपर्यंत गाझा पट्टीत वापरता येण्याजोग्या कोणत्याही लष्करी उपकरणांच्या निर्यातीला मंजुरी देणार नाही, असं ते यावेळी म्हणाले.

इस्राएलनं गाझा पट्टीत छेडलेल्या या युद्धात आतापर्यंत हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे, आणि उपासमारीचं संकट निर्माण झालं आहे. या युद्धा विरोधात जगभर निषेध व्यक्त होत आहे.

इस्रायलचा हेतू गाजापट्टीवर ताबा मिळवणं हा नसून गाजाला हमासपासून मुक्त करण्याचं असल्याचं इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं आहे. गाजापट्टीत शांततापूर्ण प्रशासनाची स्थापना केली जाईल, असं नेतन्याहू आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं.

**<><><><>**

उत्तराखंडमध्ये, उत्तरकाशी जिल्ह्यातल्या धराली इथं आपद्ग्रस्त भागात मदत आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या यंत्रणा बेपत्ता झालेल्यांचा शोध घेत आहेत, तसंच परिसरातल्या पायभूत सुविधा सुरळीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. आज सकाळी ७४ जणांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं.

लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलिस आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने आपत्तीग्रस्त भागात अडकलेले यात्रेकरू आणि स्थानिक नागरिकांचं बचावकार्य सुरु आहे. महाराष्ट्रातून आलेल्या यात्रेकरूने लष्कर आणि राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

- **- होल्ड बाईट- यात्रेकरू - -**

बचाव कार्याला गती देण्यासाठी तसंच आवश्यक लॉजिस्टिक सहाय्य देण्यासाठी भारतीय हवाई दलाची ३ चीता हेलिकॉप्टर जॉली ग्रँट विमानतळावर दाखल झाल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली.

**<><><>**

तापमान वाढीचे गंभीर परिणाम जगभरातल्या लाखो लोकांच्या आरोग्यावर होत असल्याचा इशारा WMO, अर्थात जागतिक हवामान संघटनेनं दिला आहे. जगातल्या अनेक प्रदेशांमध्ये वारंवार उष्णतेची लाट येत असून, यंदाच्या वर्षी समुद्राच्या पृष्ठभागावर देखील आतापर्यंतचं तिसऱ्या क्रमांकाचं सर्वोच्च तापमान नोंदवलं गेल्याचं WMO च्या आकडेवारीत म्हटलं आहे. गेल्या आठवड्यात पश्चिम आशिया, दक्षिण मध्य आशिया, उत्तर आफ्रिकेचा बहुतांश भाग, दक्षिण पाकिस्तान आणि नैऋत्य अमेरिकेत कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नोंदवलं गेल्याचं यात म्हटलं आहे.

तापमानवाढीमुळे जगभरात विनाशकारी वणव्यांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे जीवितहानी होत असून, हवेची गुणवत्ता खालावल्याचं WMO ने नमूद केलं आहे.

**<><><>**

अमेरिकेत पिरु, व्हेंचुरा आणि दक्षिण कैलिफोर्निया इथे मोठ्या प्रमाणावर वणवा पसरल्यानं हजारो नागरिकांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. सुमारे ४ हजार ८०० एकरवर हा वणवा पसरला असून लॉस एंजेलिस शहरलाही यामुळे धोका निर्माण झाला आहे. ४०० हून अधिक अग्निशमन कर्मचारी वणवा आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, स्थानिक प्रशासनानं आणखी काही क्षेत्र या वणव्यामुळे बाधित होण्याचा इशारा दिला आहे.

**//<><><><>//**